# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र.माअधि/अपिल/ 03/२०१८-१९
लेखा परीक्षण विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प)
ता.जि.ठाणे-४०१ १०१, दुरध्वनी क्र : २८१९२८२८
Email.Id:- mbmcaudit@gmail.com
जा.क्र.मनपा/मुलेप/ ८४/२०१७-१८ दि.९/८/२०१८

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्यलेखापरीक्षक मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री. प्रविण परमार
साई कम्युनिकेशन
शिवाजी महाराज पुतळा जवळ
चिंचोळी बंदर रोड
मालाड (प) ......अपिलार्थी

विरुध्द

जनमाहिती अधिकारी तथा
सहा.लेखापरीक्षक, लेखापरीक्षण विभाग ......प्रतिवादी

## :- विवेचन :-

अपिलार्थी श्री. प्रविण परमार पत्ता साई कम्युनिकेशन, शिवाजी महाराज पुतळा जवळ, चिंचोळी बंदर रोड, मालाड (प) यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार लेखापरीक्षण विभागाकडे माहिती अधिकारामध्ये अपेक्षिलेल्या माहितीबाबत दि.२८/०६/२०१७ रोजीचा अर्ज दिला आहे. मुद्दा क्र.०१ बाबत अपेक्षित माहिती न मिळाल्याने श्री.प्रविण परमार यांनी दि.१८/०७/२०१८ प्राप्त पत्र दि.२४/०७/२०१८ रोजी प्रथम अपिल अधिकारी यांच्याकडे अपिल दाखल केले. सदर अपिलाची सुनावणी दि.१८/०८/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता ठेवण्यात आली होती.

**अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा तपशिल:-**

लेखापरीक्षण विभागाकडील सीसीटीव्ही कॅमेराबाबत व मंजुर केलेल्या बिलांचे छायांकित प्रती इ. माहिती.

**अपिल दाखल करण्याचे कारण:-**

मुद्दा क्र.०१ बाबत अपेक्षित माहिती न मिळाल्याने अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा सहा. लेखापरीक्षक, लेखापरीक्षण विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०८/०८/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता उपस्थित राहण्याबाबत दि.२७/०७/२०१८ रोजी पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर सुनावणीस खालीलप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा अपिलार्थी उपस्थित होते.

१) श्री. प्रविण परमार (अपिलार्थी)

२) जनमाहिती अधिकारी तथा सहा. लेखापरीक्षक

**जनमाहिती अधिकारी व अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद:-**

लेखापरीक्षण विभागामार्फत मुद्दा क्र.०१ पत्रासंदर्भात जा.क्र.मनपा/मुलेप/१४८/२०१७-१८ दि.१२/१०/२०१७ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागास अभिप्रायासह अभिलेख उपलब्ध करुन देणे बाबत कळविण्यात आले आहे. परंतु अद्याप पर्यंत या संदर्भात कोणतेही अभिलेख उपलब्ध झालेले नाही असे कथन जनमाहिती अधिकारी यांनी केले.

**वरील संबंधिताचा जबाब व वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.**

## -:निर्णय:-

जनमाहिती अधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागास दिलेल्या पत्राची प्रत अपिलार्थी यांना उपलब्ध करुन द्यावी. तसेच मुददा क्र.०१ बाबतची संचिका सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभिलेखात असुन सदर विषयाबाबतची सद्यस्थिती अपिलार्थीस कळविण्याबाबत सदरील मुद्दा क्र.१ जनमाहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे तात्काळ वर्ग करावा व जनमाहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी याबाबतची अपिलार्थीने अपेक्षिलेली माहिती अपिलार्थीस तात्काळ पुरवावी.

(दिग्विजय चव्हाण)
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मुख्यलेखापरीक्षक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रति

१) श्री. प्रविण परमार
साई कम्युनिकेशन,
शिवाजी महाराज पुतळा जवळ
चिंचोळी बंदर रोड
मालाड (प)

२) जनमाहिती अधिकारी
सार्व. बांधकाम विभाग

३) जनमाहिती अधिकारी तथा
सहा. लेखापरीक्षक, लेखापरीक्षण विभाग